



# प्रीतिसंगम

www.pritisangam.com

सातारा-सांगली-कोल्हापूर-पुणे-सोलापूर






वर्ष २८ वे | अंक २४१ | पाने ४ | शुक्रवार | दि. ३ जानेवारी २०२५ | किंमत २ रूपये | R.N.I.No.MAHMAR./2001/10338 पोस्ट परवाना No./KRDDN/008/2024-2026 | फोन-२२७७२५


# लाडकी बहीण योजनेच्या अर्जांची पडताळणी होणार



**मुंबई/प्रतिनिधी:-** मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेसंदर्भात महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी भाष्य केलं आहे. आदिती तटकरे यांनी मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेसंदर्भातील शासन निर्णयात कोणताही बदल केला जाणार नाही, असं स्पष्ट केलं. ज्या महिलांचं उत्पन्न अडीच लाखांपेक्षा कमी असेल त्यांना मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळेल, असं आदिती तटकरे यांनी म्हटलं. काही अर्जांच्या बाबतीत आम्ही पडताळणीची प्रक्रिया करत आहोत, असं देखील आदिती तटकरे यांनी म्हटलं.

आदिती तटकरे यांनी राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीनंतर संवाद साधला. यावेळी त्या म्हणाल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेबाबत काही तक्रारी आल्या होत्या. आधार कार्ड मिस मॅचच्या तक्रारी आल्या होत्या. ज्यांचं बँक खात्यावरील नाव आणि आधार कार्डवरील माहिती जुळत नसल्यास त्यांना लाडकी बहीण योजनेचे पैसे मिळणार नाहीत, असं आदिती तटकरे यांनी म्हटलं. लाडकी बहीण योजनेबाबत पडताळणीची यंत्रणा तयार करत आहोत, असं देखील त्या म्हणाल्या.

## शासन निर्णयात बदल होणार नाही



मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा जो शासन निर्णय काढण्यात आलेला आहे. त्यामध्ये कसलाही बदल होणार नाही, असे आदिती तटकरे यांनी म्हटले. ज्यांचे उत्पन्न अडीच लाखांपेक्षा कमी असेल त्यांनाच या योजनेचा लाभ मिळणार आहेत. काही महिलांकडून ऑनलाइन अर्ज आणि ऑफलाइन अर्ज आले होते. काही महिलांचे लग्नानंतर स्थलांतर देखील झाले, असल्याचे आदिती तटकरे म्हणाल्या. चारचाकी वाहने ज्यांच्या नावावर असतील आणि तरी देखील ज्यांनी अर्ज केला असेल त्यांच्या नावांचा शोध घेण्यासाठी परिवहन विभागाकडून माहिती घेतली जाईल, असं देखील आदिती तटकरे म्हणाल्या. आधार कार्ड आणि बँकेतील नावात तफावत असल्यास ते अर्जदार पात्र असणार नाहीत, असं आदिती तटकरे यांनी म्हटले.

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा डिसेंबर महिन्याचा हप्ता शेवटच्या आठवड्यात जमा करण्यात आला होता. आतापर्यंत मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे सहा हप्ते महिलांच्या खात्यात वर्ग करण्यात आले आहेत. म्हणजेच आतापर्यंत महिलांच्या खात्यात प्रत्येकी ९ हजार रुपये जमा झाले आहेत. डिसेंबरच्या हप्त्याची रक्कम १५०० रुपयांनुसार महिलांच्या खात्यात वर्ग करण्यात आली आहे. महायुतीनं दिलेल्या आश्वासनाप्रमाणं राज्य सरकार लाडकी बहीण योजनेची रक्कम १५०० रुपयांवरुन २१०० रुपये कधी करणार याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे.

# पत्नीचा नवऱ्यानेच गळा दाबून केला खून

## विंग येथील घटना:संशयित पती पोलिसांच्या ताब्यात



**कराड/प्रतिनिधी:-** विंग (ता. कराड) येथे किरकोळ कारणावरून झालेल्या वादातून पतीने पत्नीचा गळा आवळला. यामध्ये बायकोचा मृत्यू झाल्याची घटना बुधवारी रात्री ११ वाजण्याच्या सुमारास घडली. याप्रकरणी पोलिसांनी संशयित पतीस ताब्यात घेतले आहे.

मयुरी मयूर कणसे (वय २७ रा. विंग ता. कराड) असे मृत्यू पावलेल्या महिलेचे नाव आहे. तर मयूर कणसे असे ताब्यात घेतलेल्या संशयिताचे नाव आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, बुधवार (दि. १) रोजी कराड तालुक्यातील विंग येथे राहत असलेल्या मयुरी कणसे व मयूर कणसे या पती-पत्नीत किरकोळ कारणावरुन वाद झाला. किरकोळ कारणावरून झालेल्या वादातून पती मयूर कणसे याने पत्नी मयुरी हिचा गळा आवळला. यामध्ये मयुरी कणसे यांचा मृत्यू झाला.

दरम्यान, या घटनेनंतर गावात एकच खळबळ उडाली. या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी पोलीस निरीक्षक महेंद्र जगताप यांच्यासह पोलीस कर्मचाऱ्यांनी भेट दिली. याबाबत कराड तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला असून पोलिसांनी संशयित पती मयूर कणसे याला ताब्यात घेतले आहे. अधिक तपास पोलीस करीत आहेत.


## कास नजीक आढळला तरुणाचा मृतदेह

**सातारा/प्रतिनिधी:-** कास धरणापासून पाच किलोमीटर अंतरावर असलेल्या फळणी, ता. जावळी गावच्या हद्दीतील झाडीत एका तरुणाचा संशयास्पद मृतदेह आढळून आला. संबंधित तरुणाच्या तोंडातून आणि नाकातून रक्तस्त्राव झाला असल्याचे दिसून आले असून, त्याचा खून झाला की नैसर्गिक मृत्यू आहे, हे शवविच्छेदन अहवालानंतरच समोर येणार असल्याचे मेढा पोलिसांनी सांगितले.

संजय शेलार (वय ३५, रा. अंधारी, ता. जावळी), असे मृत तरुणाचे नाव आहे.

जागतिक वारसास्थळ असलेल्या कास पुष्प पठार आणि धरणापासून पाच किलोमीटर अंतर पुढे गेल्यानंतर फळणी हे गाव लागते. या गावच्या हद्दीत अंधारी बस स्टॉप आहे. या थांब्याच्या एस वळणाच्या खालील बाजूस असलेल्या झाडीत काही नागरिकांना गुरुवारी सकाळी एका तरुणाचा मृतदेह निदर्शनास आला. यानंतर मेढा आणि सातारा तालुका पोलिस तातडीने तेथे पोहोचले.

# काश्मीरचे नाव कश्यप होणार?



**नवी दिल्ली/वृत्तसंस्था:-** 'काश्मीरमध्ये दहशतवादाच्या घटना ७० टक्क्यांहून अधिक कमी झाल्या आहेत. दगडफेकीच्या घटना पूर्णपणे संपुष्टात आल्या आहेत. काश्मीर पुन्हा एकदा विकासाच्या वाटेवर निघाला आहे,' असे प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केले. 'जम्मू-काश्मीर एवं लडाख : सातत्य आणि सम्बद्धता का ऐतिहासिक वृत्तांत' या पुस्तकाचे प्रकाशन करताना ते बोलत होते. यावेळी त्यांनी काश्मीरचे नाव बदलण्याचे संकेतही दिले. ते म्हणाले की, काश्मीरचे नाव ऋषी कश्यप यांच्या नावावरुन पडले असावे.

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह म्हणाले की, 'भारताला समजून घ्यायचे असेल तर या देशाला जोडणारी वस्तुस्थिती समजून घ्यावी लागेल. भारताचा इतिहास हजारो वर्षांचा आहे आणि परावलंबित्वाच्या काळात तो विसरण्याचा प्रयत्न केला गेला. हा देश कधीही एकसंध होऊ शकत नाही, असे खोटे पसरवले गेले आणि लोकांनी ते स्वीकारले. आता हे बदलण्याची गरज आहे.'

आयसीएचआर आणि एनबीटी बद्दल कृतज्ञता व्यक्त करताना अमित शाह म्हणाले की, या पुस्तकाने मिथ्यांना छेद देत ऐतिहासिकदृष्ट्या सत्य सिद्ध करण्याचे काम केले आहे. राज्यकर्त्यांना खूश करण्यासाठी लिहिलेला इतिहास काढून घेण्याची वेळ आली आहे. हजारो वर्षांचा गौरवशाली इतिहास पुराव्यानिशी लिहा आणि जगासमोर मांडा.'

या पुस्तकाचे उदाहरण देताना ते म्हणाले की, त्यात सभ्यतेची रचना आणि तिच्या संवर्धनाची अनेक उदाहरणे आहेत. चरकाचे औषधशास्त्र, पाणिनीचे व्याकरण, भरतमुनींचे अर्थशास्त्र आणि आदि शंकराचार्यांचे चातुर्मास यांना एकत्र केले तर काश्मीरचा इतिहास आपोआपच प्रस्थापित होईल,' असे त्यांनी सांगितले.

अमित शाह यांनी कलम ३७० हे काश्मीरमधील दहशतवादाचे कारण असल्याचे सांगितले. ते म्हणाले की कलम ३७० नेच खोऱ्यातील तरुणांच्या मनात दहशतवादाची बीजे पेरण्याचे काम केले. त्यासाठी त्यांनी राजस्थान आणि गुजरातचे उदाहरण दिले.




# समाजात बंधुता रुजवण्यासाठी एकदिलाने काम करुया:प्रदीप रावत

## डॉ.आंबेडकरांनी भेट दिलेल्या संघस्थानावर बंधुता परिषदेचे आयोजन

**कराड/प्रतिनिधी:-** इतिहासाच्या सागरातून कोळसा उगळायचा की चंदन हे आपण ठरवायचं. खऱ्या अर्थाने आपल्या प्रत्येक कृती मधून बंधुता जोपासून आपण चंदनाचा सुगंध सर्वत्र पसरविण्यासाठी प्रयत्न करुया, आपली गावकी एक आहे पण भावकी सुद्धा एक झाली पाहिजे, असे प्रतिपादन बंधुता परिषदेचे अध्यक्ष माजी खासदार प्रदीपदादा रावत यांनी केले.

दिनांक २ जानेवारी १९४० या दिवशी कराड मध्ये भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शाखेस भेट दिली होती. या ऐतिहासिक घटनेचे स्मरण म्हणून ज्या ठिकाणास डॉ. आंबेडकरांनी भेट दिली त्या श्री भवानी संघ स्थानावर बंधुता परिषद या वैचारिक कार्यक्रमाचे आयोजन कराड येथे लोककल्याण मंडळ ट्रस्ट द्वारे करण्यात आले. हिंदू संघटनेशिवय जातीभेद नष्ट होणार नाहीत असे डॉ.आंबेडकरांचे विचार होते. त्याचप्रमाणे सकल हिंदू, बंधू बंधू या विचाराने रा. स्व.संघ हिंदू संघटनेचे काम करत आहे. असे रावत म्हणाले.

या परिषदेतील परिसंवादामध्ये आंबेडकरी विचारवंत ड क्षितिज टेक्सास गायकवाड, दलित महासंघाचे अध्यक्ष प्रा. मच्छिंद्र सकटे, बौध्द युवक संघटनेचे अध्यक्ष ड विजय गव्हाळे या मान्यवरांनी आपले विचार व्यक्त केले.

लहानपणापासून गावात अस्पृश्यतेचे चटके सोसलेले असल्यामुळे मी बंधुतेच्या शोधात होतो. सुरुवातीच्या जीवनात तथाकथित पुरोगामी म्हणवणाऱ्या लोकांनी, विद्रोही लोकांनी, डाव्या विचारवंतांनी माझी दिशाभूल केल्याचे अनुभव मला आले. ढोंगी पुरोगाम्यांपासून दलित समाज आणि संपुर्ण देश आपण वाचवायला हवा. जातीभेद नष्ट करून बंधुता निर्माण करण्यासाठी आम्ही संघाच्या सोबत आहोत, असे प्रतिपादन मच्छिंद्र सकटे यांनी आपल्या भाषणात केले.

डॉ. आंबेडकरांवर सर्वाधिक अन्याय काँग्रेसच्या तत्कालीन नेत्यांनी केला आणि आज याच पक्षाचे नेते संविधान बचावचा नारा देत आहेत असे प्रतिपादन ड. क्षितीज गायकवाड यांनी केले.

पान ४ वर

# सातारा जिल्हाधिकारीपदी संतोष पाटील

## जितेंद्र डूडी यांची पुणे जिल्हाधिकारी म्हणून बदली

**सातारा/प्रतिनिधी:-** सातारा जिल्ह्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांची पुणे जिल्हाधिकारी म्हणून बदली झालेली आहे. त्यांच्या जागेवर संतोष पाटील यांची वर्णी लागली आहे. अठरा महिन्याची जितेंद्र डूडी यांची साताऱ्याची कारकिर्द लक्षवेधी ठरली आहे.



सातारा जिल्ह्याचे तत्कालीन जिल्हाधिकारी रुचेश जयवंशी यांची तडकाफडकी बदली झाल्यानंतर ७ जून २०२३ रोजी त्यांच्या जागेवर सांगली जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितेंद्र डूडी यांची सातारा जिल्हाधिकारी म्हणून वर्णी लागली होती. गेल्या दीड वर्षाच्या कार्यकाळात डूडी यांनी अनेक लोकाभिमूख निर्णय घेवून जिल्ह्याच्या विकासाला चालना दिली होती. महाराष्ट्राचे नंदनवन असलेल्या महाबळेश्वरमध्ये बोकाळलेल्या अतिक्रमणांविरोधात डूडी यांनी खमकी भूमिका घेऊन ही अतिक्रमणे जमीनदोस्त केली होती. तसेच कास येथील अतिक्रमणांविरोधातही डूडी यांनी हातोडा उगारलेला होता. स्मार्ट स्कूल , स्मार्ट पीएचसी गौण खनिज महसूल वृध्दी लोकसभा व विधानसभा निवडणुकांचे नेटके नियोजनं , न्यू महाबळेश्वर प्रकल्पात प्रस्तावांचे सुलभीकरण या माध्यमातून डूडी यांनी आपल्या कामाची अवध्या अठरा महिन्यात छाप पाडली होती.

पान ४ वर



नुतन जिल्हाधिकारी संतोष पाटील यांचे स्वागत करताना अपर जिल्हाधिकारी जीवन गलांडे, सोबत निवासी उपजिल्हाधिकारी नागेश पाटील, उपजिल्हाधिकारी (महसूल) विक्रांत चव्हाण, जिल्हा पुनर्वसन अधिकारी मनोहर गव्हाड, प्रांताधिकारी वाई राजेंद्र कचरे उपस्थित होते.

# पाडळीवाडीत ट्रॅक्टर वरून पडल्याने बलिकेचा मृत्यू

**शिराळा/प्रतिनिधी:-** पाडळीवाडी (ता. शिराळा) येथे ट्रॅक्टर च्या मडगार्डवर बसलेल्या तीन वर्षांच्या बलिकेचा खाली पडून डोक्यास गंभीर दुखापत झाल्याने मृत्यू झाला. किर्ती हनुमान थोरात (वय ३ रा. रानमळा ता. गेवराई जि. बीड सध्या रा. पाडळीवाडी) असे मयत बलिकेचे नाव आहे. सदर घटना दि.२० डिसेंबर रोजी दुपारी साडे बारा च्या दरम्यान घडली.याबाबत आज दि.३१ रोजी फिर्याद दाखल करण्यात आली आहे.

याबाबत माहिती अशी की , हनुमान पंडीत थोरात (वय ३५ , व्यवसाय ऊसतोड मजुर मुळ रा. रानमळा ता. गेवराई जि. बीड सध्या रा. पाडळीवाडी) यांनी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. यामध्ये त्यांची लहान मुलगी किर्ती हिला संशयित आरोपी महेश परमेश्वर शेळके ( रा. रानमळा ता. गेवराई जि. बीड सध्या रा. पाडळीवाडी) याने ट्रॅक्टरचे मोठे टायरचे मडगार्ड वर बसवून ट्रॅक्टर चालवत घेऊन गेला.गावचे हद्दीतील धनाजी पाटील यांचे घराजवळ कृष्णा पाटील यांचे मालकीचे शेतातील कच्च्या रस्त्यावर महेश शेळके याने ट्रॅक्टर चालवित घेवून जात असताना ट्रॅक्टरला अचानक ब्रेक मारल्याने ट्रॅक्टर थांबला .यावेळी किर्ती मडगार्ड वरून ट्रॅक्टरचे ब्रेक पायडलवर पडून तिचे डोक्याला गंभीर दुखापत झाली. यामध्ये तिचा मृत्यू झाला. मयत मूलगीचे कुटुंबीय रानमळा येथील असल्याने ते गावाकडे कीर्तीचा मृतदेह घेऊन गेले होते. तेथील कार्य आटपून आल्यावर आज पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. ट्रॅक्टर ड्रायव्हर महेश याच्या हलगर्जीपणामुळेच ट्रॅक्टरचे मोठे टायरचे मडगार्ड वरून पडून कीर्ती ही मयत झाली आहे.याबाबत महेश शेळके याच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्यातील ट्रॅक्टर पोलिसांनी ताब्यात घेतला आहे. पुढील तपास हवालदार इरफान मुल्ला हे करीत आहेत.मयत कीर्तीच्या पश्यात आजी ,आजोबा, आई ,वडील, भाऊ , बहीण असा परिवार आहे. हनुमान थोरात हे कुटुंबीय उसतोडीसाठी पाडळीवाडी येथे आले होते मात्र कीर्ती मयत झाल्याने आज मंगळवारी फिर्याद दाखल करून पुन्हा गावाकडे निघून गेले आहेत.

## क्रांतीज्योती..

सावित्री माई रूपांत
सळाळे क्रांतीज्योती
धन्य तुझ्या जन्मांने
नायगावची ती माती
क्रांती सूर्याची पत्नी
करी तया स्वप्न पूर्ती
सार्थ जोडी दोघांची
देई एक दुजा स्फुर्ती
प्रथम सार्थशिक्षीका
जाणे शिक्षण महती
वातीस लावून वाती
उजळी ज्ञान ज्योती
अंधश्रध्दे काजळली
काळ्याकभिन्न राती
तव रूपात ज्ञानाचा
दिवा मिळाला हाती
आडवे कर्मठ लोक
बांधी भीषण भिंती
रुढीपरंपरा न् जाती
दाखवी अज्ञान भिती
विधवा परित्यक्तांना
कळे नव्यानी नाती
दीन दुबळ्यां जनांस
दिली अद्भुत शक्ती

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

# शेतकऱ्यांची ती जमिन परत करणार

## पहिल्या कॅबिनेट बैठकीत मोठे निर्णय

**मुंबई/प्रतिनिधी:-** राज्य सरकार ४ हजार ८४९ एकर जमीन शेतकऱ्यांना परत करणार, राज्यातील तब्बल ९६३ शेतकऱ्यांना होणार फायदा. महाराष्ट्रातील ९६३ शेतकऱ्यांच्या ४ हजार ९४९ जमिनी शासन जमा झाल्या होत्या. आज मुख्यमंत्र्यांनी मंत्रिमंडळात निर्णय घेत संपूर्ण ९६३ शेतकऱ्यांच्या जमीनी त्यांच्या मालकीच्या होणार. रेडीरकनरच्या २५ टक्के रक्कम शेतकऱ्यांना भरावे लागणार.महायुती सरकारचा मंत्रिमंडळ विस्तार झाल्यानंतर गुरुवारी मंत्रालयात राज्य मंत्रिमंडळाची पहिली बैठक पार पडली. या बैठकीत अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले.

मंत्रालयातील आजच्या बैठकीला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि संबंधित अधिकारी उपस्थित होते. यावेळी मंत्रालयात एफआरएस तंत्रज्ञान बसविण्यासंदर्भात चर्चा झाली. सहाव्या मजल्यावर अभ्यंगत आणि इतरांना प्रवेश द्यायचा की नाही यासंदर्भातही आजच्या बैठकीत चर्चा होणार आहे. मंत्रालयात अभ्यंगताकडून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला जातोय या संदर्भात चर्चा झाल्याचे समजते.

शासनाच्या यादीवर मुंबई जिल्हा बँकेला घेऊन व्यवहार करण्याची मुभा दिल्याबद्दल मी शासनाचं आभार व्यक्त करतो आणि ज्या जिल्हा बँकांना सलग अ वर्ग आहे अशा जिल्हा बँकांमध्ये शासनाचा व्यवहार करायला त्या ठिकाणी परवानगी त्यामध्ये मुंबई जिल्हा मध्यवर्ती बँक या ठिकाणी बसते आणि



अनेक सरकारी उपक्रमांना मुंबई जिल्हा बँकेचे मदत झाले आणि शासनाच्या योजना मुंबई बँकेचे मदत झाली लाडक्या बहिणींची ७० हजार अकाउंट झिरो बॅलन्स हे काढण्याचे कार्य राज्यात फक्त एका जिल्हा मध्यवर्ती बँकेने केले ते मुंबई जिल्हा बँकेने केले, असे बँकेचे अध्यक्ष आणि आमदार प्रवीण दरेकर यांनी म्हटले.

मुंबई जिल्हा बँकेने एकही रुपया न घेता लाडक्या बहिणींच्या अकाउंट काढले. गिरणी कामगारांना कुठलंही मॉर्गेज न घेता, जामीन न घेता त्या ठिकाणी कर्ज देऊन कामगारांना मदत केली. माथाडी कामगारांना मदत केली. शिक्षक पोलीस आणि अशा पद्धतीने या सर्वांना मदत केली. आता सरकारने मुंबै बँकेला शासनाच्या यादीवर आल्याने या सगळ्याला आणखी गती मिळेल आणि सरकारलाही मुंबै बँक त्यांच्या योजनांसाठी मदत करेल, सरकारला ज्या संकल्पना साकार करायच्या आहे, त्या साकार करण्यामध्ये जिल्हा मध्यवर्ती बँक आपला खारीचा वाटा किंवा योगदान या ठिकाणी देऊ शकेल, अशी भावना दरेकर यांनी व्यक्त केली.


## भावपूर्ण श्रद्धांजली



श्री.भिमराव धोंडी पाटील (दादा)

करा‍ड दक्षिणचे ज्येष्ठ नेते व जिल्हा परिषदेचे माजी कृषी सभापती,

**श्री.भिमराव धोंडी पाटील (दादा)**

(वय ९५) यांचे दु:खद निधन झाले. त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो हीच ईश्वरचरणी प्रार्थना..!

**ग्रामपंचायत काले,ता.कराड,जि.सातारा**

टीप:रक्षाविसर्जन विधी-शुक्रवार दि.३ रोजी सकाळी ९.३० वा. काले (प्रतिभानगर) येथे होणार आहे.

ज्याची कसलीही मागणी नसते तो सम्राट असतो.
– महर्षि कणाद

# संपादकीय

## उशिरा सुचलेले शहाणपण

मागील बऱ्याच दिवसांपासून मणिपूरमध्ये हिंसाचाराच्या घटना घडत आहेत. विरोधी पक्षांकडून या मुद्द्यावरून केंद्र सरकारला कायम लक्ष्य केले जाते. वर्षभरात मणिपूर राज्यात हिंसाचारात साधारण ३०० जणांची हत्या झाली आहे. अनेक स्त्रियांना अत्याचार करून मरेपर्यंत मारल्याच्या घटनाही घडल्या आहेत. तशाप्रकारचे व्हिडीओ समाजमाध्यामांवर प्रसारित झाले आणि मणिपूर हिंसाचाराचे गांभीर्य देशभर पोहोचले. अर्थात केंद्र सरकारने मणिपूरचे गांभीर्य देशवासियांना समजणार नाही असेच प्रयत्न केले. मणिपूर प्रकरणावर विरोधकांनी सत्ताधार्यांवर जोरदार टीका केली. एवढेच नव्हे तर काही अमेरिकासारख्या प्रगत देशांनीही मणिपूर प्रकरण गंभीर असल्याचे म्हटले. आता मणिपूर येथील वांशिक हिंसाचार आटोक्यात आला आहे. यादरम्यान वर्षाच्या शेवटच्या दिवशी मणिपूरचे मुख्यमंत्री एन बिरेन सिंह यांनी मणीपुरात सुरू असलेल्या हिंसाचाराच्या मुद्द्यावर खेद व्यक्त करत माफी मागितली आहे. यापूर्वी ना पंतप्रधान नरेंद्र मोदी, ना मुख्यमंत्र्यांनी मणिपूर प्रकरणी खेद व्यक्त केला, ना माफी मागितली. दि. ३ मे २०२३ पासून मणिपूरमध्ये हिंसाचार होत असून यामध्ये आतापर्यंत शेकडो लोकांचा मृत्यू झाला आहे तर हजारो लोक बेघर झाले आहेत. साधारण दीड वर्षांनी मणिपूरचे मुख्यमंत्री एन बिरेन सिंह यांना उपरती झाली हे बरे झाले. त्यांनी मणीपुरात हिंसाचार झाला आणि ती घटना दुर्दैवी होती असे म्हटले आहे. मणिपूरचे मुख्यमंत्री एन बिरेन सिंह यांनी पत्रकार परिषदेत मणिपूरच्या मुद्द्यावर पहिल्यांदाच भाष्य केले. ते म्हणाले की, हे संपूर्ण वर्ष खूप दुर्दैवी होते. मला खेद वाटतो आणि गेल्या ३ मे पासून आजपर्यंत जे काही घडत आहे त्याबद्दल मी राज्यातील जनतेची माफी मागू इच्छितो. मुख्यमंत्री पुढे बोलताना म्हणाले की, घटनांमध्ये अनेकांनी आपल्या जवळच्या व्यक्तींना गमावले आहे आणि अनेकांना आपले घर सोडून जावे लागले. मला याचा खूप खेद वाटतो. मला सर्वांची माफी मागायची आहे. मणिपूर राज्यात मतैकी आणि कुकी व नागा जमाती आहेत. या आदिवासी जमातींमध्ये आरक्षणावरून वाद सुरु होते. यानंतर राज्यात हिंसाचाराचा भडका उडाला. सार्वजनिक स्थळांचे नुकसान, स्त्रियांवर अत्याचार करून हत्या, जाळपोळ असा प्रकार घडला. राज्य सुरक्षा दलाला राज्यातील हिंसाचार शमवता आला नाही, हे दुर्दैवी होय. केंद्र सरकारने मणिपूर हिंसाचार मिटवण्यात गांभीर्याने लक्ष घातले नाही. मणिपुरमधील हिंसाचार हा देशाच्या शांततेला लागलेला डाग आहे आणि हा डाग मिटवण्यासाठी केंद्र सरकारमधील धुरंधरांनी काहीच केले नाही. आता मुख्यमंत्री एन बिरेन सिंह यांनी मागितलेली माफी म्हणजे उशिरा सुचलेले शहाणपण होय असेच म्हणता येईल.

गेल्या तीन–चार महिन्यांपासून मणिपूर राज्यात शांतता निर्माण करण्याच्या दिशेने सकारात्मक प्रगती झाल्याचे मणिपूर येथील मुख्यमंत्री एन बिरेन सिंह यांनी म्हटले आहे. तसेच त्यांनी विश्वास व्यक्त केला आहे की, नवे वर्ष २०२५ पासून मणिपूरमध्ये शांतता आणि सामान्य स्थिती परत येईल. राज्यातील सर्व समुदायांना आवाहन करत मुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे की, जे काही झाले ते झाले. आता आपण भूतकाळातील चुका माफ करून त्या विसरल्या पाहिजेत आणि आपल्याला एक नवीन जीवन, शांत मणिपूर, समृद्ध मणिपूरची सुरूवात करावी लागेल. सर्व मान्यता मिळालेल्या ३४–३५ जमातींसोबत एकत्र राहण्याची आणि भविष्यातही एकत्र राहायला हवे, असेही एन बिरेंद्र सिंह यांनी म्हटले आहे. मणिपूरमध्ये शांतता प्रस्थापित होत आहे आणि चर्चा आणि संवाद हाच त्याचा एकमेव मार्ग आहे, ज्याच्यासाठी केंद्र सरकारने आधीच पुढाकार घेतला आहे, असेही मणिपूरचे मुख्यमंत्री एन बिरेन सिंग इम्फाळ येथे झालेल्या पत्रकार परिषदेत म्हणाले.

दि. ३ मे २०२३ पासून मणिपूरमध्ये आरक्षण आणि आर्थिक लाभावरून बहुसंख्य मतैकी आणि कुकी समुदायामध्ये हिसंचार सुरू आहे. या हिंसाचारात २०० हून अधिक लोक मारले गेले आहेत. तर हजारो लोक विस्थापित झाले आहेत. मणिपूरचे मुख्यमंत्री एन बिरेन सिंह यांनी मणिपुरातील हिंसाचाराबाबत बोलताना म्हटले आहे की, आतापर्यंत एकूण सुमारे २०० लोक हिंसाचारात मारले गेले आहेत आणि सुमारे १२,२४७ एफआयआर नोंदवले गेले आहेत. तसेच ६२५ आरोपींना अटक करण्यात आली आहे.तर सुमारे ५,६०० शस्त्रे आणि स्फोटकांसह मोठ्या प्रमाणात दारूगोळा जप्त करण्यात आला आहे. मणिपूर राज्याचे प्रश्न हाताळण्यात बऱ्यापैकी यश आले आहे. केंद्र सरकारने विस्थापित कुटुंबांना मदत करण्यासाठी पुरेसे सुरक्षा कर्मचारी आणि पुरेसा निधी उपलब्ध करून दिला आहे. पिडीत व्यक्तींसाठी नवीन घरे बांधण्यासाठी पुरेसा निधी देण्यात आला आहे, असेही सिंह यांनी म्हटले आहे. मणिपुरातील हिंसाचार काळात तेथील संपर्कजाल पूर्णपणे बंद होते. त्यामुळे बर्याचशा घटना उघडकीस आल्या नाहीत. तर काही प्रमाणात अफवा पसरण्यास अटकाव झाला. मणिपूरातील हिंसाचार, अत्याचार पिडीत नागरिकांसाठी मणिपूर सरकारने नव्याने घरे बांधून दिली पाहिजेत. तसेच विद्यार्थ्यांच्या शाळांसाठी सरकारने नवीन शाळा उभारल्या पाहिजेत. मणिपुरमधील शांतता अबाधित होऊ नये म्हणून तेथील लोकांना विकासाच्या कक्षेत आणण्यासाठी रोजगार निर्मितीचे आव्हान तेथील सरकारसमोर आहे. रोजगार निर्मितीमुळे नागरिक स्वबळावर उभे राहतील, राज्यात विकास होईल. ही विकासाची प्रक्रिया सर्व नागरिकांना एकत्र आणेल. भाजपाच्या सत्तेच्या कार्यकाळात मणीपुरात झालेला हिंसाचार न विसरणारा आणि दुर्दैवी होता. देशात एकोप्याची भावना निर्माण होण्यासाठी सरकारचे आर्थिक व विकासात्मक धोरण महत्वाचे असते. त्याची जबाबदारी राज्य सरकारवर असते, बऱ्याच वेळा केंद्र सरकारही याला जबाबदार असते. देश लोकशाहीच्या निकषानुसार सुरु असताना मणिपुरात घडलेल्या हिंसाचाराचे कोणीही समर्थन करू शकत नाही. परंतु उशिरा का होईना तेथील मुख्यमंत्र्यांनी मणिपूर हिंसाचाराबाबत तोंड उघडले हे बरेच झाले. हे त्यांना उशिरा सुचलेले शहाणपण आहे असे म्हणता येईल.

### बोधकथा

## दुसऱ्यांचे उपकार विसरू नका

इसापनीतीतील एक छान गोष्ट आहे. एकदा एका जंगलामध्ये एक लांडगा राहत होता. तो अत्यंत खादाड आणि दुष्ट होता. त्याला एकदा खूप जोऱ्याची भूक लागली, त्याने जंगलातले अनेक प्राणी मारून खाल्ले. पण इथेच तो अडकला. एका प्राण्याला मारल्यानंतर त्याला खाताना त्याच्या घशात त्या प्राण्याचे हाड अडकले.

त्याने ते हाड काढायचा खूप प्रयत्न केला, परंतु त्याला यश मिळाले नाही. त्याच्या त्या प्रयत्नांनंतर त्याला खूप त्रास सुरू झाला. त्याला नेमके काय करावे हेच समजत नव्हते. त्याने सुरुवातीला भुरपुर पाणी पिले, परंतु त्याला यश मिळाले नाही. मग त्याने आपल्या इतर मित्रांना आपल्या घशातले हाड काढण्यास सांगितले. परंतु त्याच्या साऱ्या मित्रांनी त्याच्याकडे पाठ फिरवली.

शेवटी त्याला त्याच्या डोक्यावरून एक बगळा उडत जाताना दिसला. त्याने त्या बगळ्याला आपली व्यथा सांगितली. तो म्हणाला बगळ्या तू तुझ्या त्या लांब चोचीने जर माझ्या घशात अडकलेले हे हाड काढलेस तर मी तुला बक्षीस देईन, तुझे ते उपकार मी कधीही विसरणार नाही.

# कराड दक्षिणेच्या राजकारणातील दादा माणूस

**काले म्हंटले की भिमरावदादा हे समिकरण १९७५ पासून सातारा जिल्ह्यात रूड झालेले होते. त्यांनी सरपंच पदापासून ते पंचायत समितीचे सभापती पद, जिल्हा परिषदेत अनेक वेळा प्रतिनिधीत्व तसेच सभापती, बाजार समितीचे सभापती अशी विविध पदे भूषवली. सातारा जिल्ह्यात काले गावाची ओळख ज्यांच्यामुळे निर्माण झाली ते भिमरावदादा आज नाहीत. परखड मत व्यक्त करताना कोणत्याही नेत्याला ग्रामीण भाषेत सूनवायला मागे–पुढे न पाहता सर्वसामान्य मानसांना न्याय कसा देता येईल यासाठी सातत्याने प्रयत्नशिल राहण्याचे काम त्यांनी केले आणि आपल्या कार्याचा राजकीय पटलावर वेगळा ढसा उमटवला. त्यांच्या निधनाने दक्षिणच्या राजकारणात एका दादा माणसाची पाकळी निर्माण झाली...**



काले पंचक्रोशीतील कराड दक्षिण परिसरात राजकारणावर सत्तर वर्षांची पक्कड असणारे ज्येष्ठ नेते व जिल्हा परिषदेचे माजी कृषी सभापती भिमरावदादा धोंडी पाटील यांचे वयाच्या ९२ व्या वर्षी वृद्धापकाळाने बुधवार दि. १ जानेवारी २०२५ रोजी निधन झाले. त्यांच्या निधनामुळे कराड दक्षिणमध्ये राजकीय व सामाजिक पोकळी निर्माण झाली आहे. दादांची राजकारणावर ७० वर्ष राजकीय पकड होती. दादा राजकारणातील ज्येष्ठ महर्षी होते याचा हाच पुरावा असावा.

वयाच्या २४ व्या वर्षी म्हणजे १९६२ साली नामांकित पैलवान असणाऱ्या भीमराव दादांनी काले ग्रामपंचायतची निवडणूक लढवली आणि राजकारणाचा श्री गणेशा केला. १९६२ ते ६७ यादरम्यान दादांनी काले गावचे सरपंच म्हणून काम पाहिले. या दरम्यान त्यांचा राजकीय अनुभव वाढला आणि लोक संपर्कही वाढला. १९६७ ते १९७२ दरम्यान दादांनी कराड पंचायत समितीचे उपसभापती पद भूषवले. यानंतर १९७२ ते ७७ यादरम्यान कराड पंचायत समितीचे सभापती म्हणून कार्यभार सांभाळला. पंचायत समितीत सभापतीपदी असताना त्यांनी नागरिकांसाठी भरीव कामे केली.



दादांनी काले पंचक्रोशीतील सर्वसामान्य कार्यकर्त्यांशी नाळ जोडली. या पंचक्रोशीत दादांचा शब्द राजकारणात प्रमाण मानला जात असे. अजूनही दादांच्या समाजकारणाचा प्रभाव कराड दक्षिणमध्ये दिसून येतो. ते परखड व स्पष्टवक्ते होते. दादा रांगड्या भाषेत सर्वसामान्य माणसांना राजकारण समजावून सांगायचे, लोकही त्यांचे बोलणे मनापासून ऐकत असत. दादांचा लोकसंपर्क दांडगा होता. तसेच शेतमजूर ते शेतकऱ्यांपर्यंत त्यांनी सर्वांच्या अडचणी समजून घेतल्या आणि त्यांना मदत केली. तसेच समकालीन नेत्यांशी त्यांचे ऋणानुबंध होते. अशा प्रकारे दादांचे नाळ सर्वसामान्यांशी जोडली होती.

१९७७ – ७९ व २००५ ते २००८ या दरम्यान दादांनी दोन वेळा जिल्हा परिषदेमध्ये कृषी सभापती पद भूषवले. यादरम्यान त्यांनी शेतकऱ्यांसाठी विविध उपयुक्त योजना राबवल्या. तसेच कृष्णा कारखान्याचे संचालक म्हणून त्यांनी अनेक वर्षे काम पाहिले. यादरम्यान त्यांनी ऊस उत्पादकांच्या प्रश्नांची सोडवणूक केली. १९८० च्या दरम्यान दादांनी कराड दक्षिण विधानसभा निवडणूक लढवली.

गोरगरीब, दिन दलितांशी दादांनी चांगली नाळ जोडली होती. त्यांचे सामाजिक कार्य पाहून राज्य शासनाने त्यांना दलित मित्र पुरस्कार दिला. तसेच काले पंचक्रोशीतील परिसरात दादांचा शब्द राजकारणात प्रमाण मानला जायचा. दादांची राजकीय भूमिका हीच सर्वांची भूमिका असायची. दादांची भूमिका राजकारणात खूप महत्त्वाची होती. कारण दक्षिण विधानसभा मतदारसंघ निवडणूक असो की कृष्णा साखर कारखान्याची निवडणूक असो, सर्व निवडणुकीमध्ये दादांची भूमिका निर्णायक ठरत असे. अनेक नेत्यांशी दादांचे ऋणानुबंध होते. भिमराव दादा हे नामवंत पैलवान होते. त्यामुळे त्यांची भाषा रांगडी होती. ते सर्वसामान्य माणसाला त्यांच्या रांगड्या भाषेतून कमी शब्दांत चांगल्या पद्धतीने समजून सांगायचे. यामुळेच सर्वसामान्य माणूस त्यांच्या नेतृत्वावर प्रेम करत असे. दादांचा संपर्क जुन्या कार्यकर्त्यांसोबत तरुण कार्यकर्त्यांसोबतही होता. दादांच्या रोखठोक व स्पष्टवक्तेपणामुळे युवा पिढी त्यांच्यावर प्रेम करायची.

दादांनी लोकांच्या प्रेमाखातर काही वर्षे बाजार कृषी समितीचे संचालक पद भूषवले. दादांची राहणी साधी होती परंतु लोकसंपर्क दांडगा असल्यामुळे सर्वत्र त्यांचा लीलया वावर असे. सर्व नेते दादांना आपले मानायचे परंतु दादांनी कधी आपली भूमिका सोडली नाही. सर्वसामान्यांच्या अडीअडचणी समजून घेणारे दादा सर्वांना मदत करायचे. समकालीन नेत्यांशी त्यांचे ऋणानुबंध होते. सर्वसामान्य माणूस हा प्रगतीपथावर गेला पाहिजे, सर्वसामान्य माणसाची प्रगती झाली पाहिजे या विचाराने भीमराव दादा यांनी राजकारण कमी पण समाजकारण जास्त केले. त्यामुळे दादांना काले पंचक्रोशीत मानणारा वर्ग खूप मोठा होता.

**अशोक सुतार**


# स्त्री मुक्ती आंदोलनाची युगकर्ती



क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, थोर समाजक्रांतिकारक महात्मा जोतिराव फुले यांच्या सुविद्य पत्नी. सावित्रीबाईंचा जन्म, एका गरीब शेतकरी कुटुंबात शिरवळनजीकच्या नायगाव या खेड्यात दि. ३ जानेवारी १८३१ ला झाला. शिक्षणाची परंपरा नसलेल्या घरातील सावित्रीबाईंनी लग्नानंतर शिकून, जोतिरावांच्या खांद्याला खांदा लावून समाज सुधारणांचा क्रांती रथ अखेरच्या क्षणापर्यंत अव्याहतपणे चालू ठेवला.

एकोणिसाव्या शतकात शुद्रांची आणि स्त्रीयांची सामाजिक स्थिती पशूपेक्षाही हीन होती. देवधर्माच्या नावाखाली बहुसंख्य समाज गुलामगिरीत अडकला होता. ज्या काळात स्त्रीने शिकणे हे महापाप मानले जाई, त्या काळी निरक्षर सावित्रीबाईंनी विवाहानंतर शिक्षण घेतले. प्रारंभी पतीच्या आग्रहास्तव आणि काळाच्या ओघात स्वयंप्रेरणेने, स्वाध्यायाद्वारे. स्वतःच्या अखंड कार्यकर्तृत्वाने त्या आद्यशिक्षिका, मुख्याध्यापिका, समाजसेविका, दीनदलितांच्या उध्दारक; इतकेच नव्हे, तर आधुनिक मराठी कवितेच्या गंगोत्री बनल्या; आणि जोतिबांच्या मृत्यूनंतर तर सत्यशोधक समाजाचे नेतृत्वही त्यांनी सांभाळले.

स्त्री–शूद्रांचे व दीनदलितांचे दुःख पाहून सावित्री रडत बसल्या नाहीत. रडण्यापेक्षा स्त्री–शूद्रांचा दुःखमुक्तीचा संग्राम जोतीरावांसारख्या क्रांतिवीराबरोबर मोठ्या जिद्दीने, धैर्याने, चिकाटीने, कौशल्याने त्यांनी यशस्वी केला. महात्मा जोतिबांनी दि. १४ जानेवारी १८४८ रोजी पुणे येथील भिडे वाड्यात मुलींची शाळा सुरू केली. मुलींसाठी काढण्यात आलेली ही शाळा सबंध हिंदुस्थानातील पहिलीच शाळा होय. सावित्रीबाईंनी मुलींच्या शाळेत स्त्री–शिक्षिका म्हणून काम करण्यास सुरुवात केली. स्त्री व शूद्र–अतिशूद्रांसह अखिल मानवजातीच्या कल्याणासाठी त्यांनी आपली सर्व शक्ती वेचली. स्त्री–पुरुष समानतेचा पहिला जाहीरनामा सावित्रीबाईंचा आहे. सन १८५२ मध्ये विश्रामबागवाड्यात जोतीरावांच्या स्त्री–शिक्षण–कार्याबद्दल ब्रिटिश सरकारकडून शाल व श्रीफळ देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.



**डॉ.राजाराम कांबळे**
**आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, नागठाणे**

सावित्रीबाईंनी मुलींसाठी व अस्पृश्यांसाठी शाळा काढणे, आपल्या घरातच बालहत्या–प्रतिबंधक गृह चालविणे, गोरगरीब कामगारांसाठी रात्रशाळा काढणे, दुष्काळात अन्नान्नदशा झालेल्या गरिबांसाठी अन्नछत्रे सुरू करणे, केशवपन – विधवाविवाहबंदी देवदासी पध्दती इ. दुष्ट प्रथांचे उच्चाटन करणे म्हणजे एकोणिसाव्या शतकातले या देशातील चमत्कारच होत! त्या काळात मुला–मुलीचे बालविवाह होत. अनेक मुली बालविधवा होत. तरुण वयातील विधवांना पुरुष फसवीत. सावित्रीबाईंनी बालहत्या प्रतिबंधकगृह सुरू केले. विधवांना आसरा दिला. तरूण विधवांना हे गृह म्हणजे फार मोठा आधार होता. स्वतःच्याच घरात स्थापन केलेल्या अनाथ बालकाश्रमात सावित्रीबाईंनी '३५ ब्राह्मण विधवांची बाळंतपणे केली. काशीबाई या ब्राह्मण विधवेच्या, अनैतिक संबंधातून झालेल्या यशवंत नावाच्या मुलाला फुले दांपत्याने दत्तक घेऊन त्याला आपल्या मुलाचा दर्जा दिला.

स्त्रीवर्गाची विटंबना, अवहेलना आणि अघोरी छळ थांबावा म्हणून त्यांनी प्रयत्न केले. जिवंत व मृत भगिनींचे केस कापू नयेत अशी न्हाव्यांना विनंती करण्याचे ठरले. त्यासाठी पुणे, मुंबई परिसरातील न्हाव्यांची एक परिषद बोलविली. न्हावी कोणते अघोरी काम करतात यावर चर्चा झाली. ताबडतोब न्हाव्यांनी संपाचा निर्णय घेतला. या देशातील न्हाव्यांचा, हा पहिला संप होय.

१८७६–७७ साली महाराष्ट्रात जो भीषण दुष्काळ पडला त्यावेळी जोतीरावांनी सरकारचे त्याकडे लक्ष वेधले. स्वतःच्या घरचे खंडोगणती धान्य गोरगरीबांना वाटून दिले. दुष्काळपीडित गरीब मुलांसाठी 'व्हिक्टोरिया बालाश्रम'ची स्थापना केली होती. त्याठिकाणी सावित्रीबाई आपल्या मैत्रिणींसह स्वतः स्वयंपाक करीत. त्याकाळी शूद्र–अतिशूद्र जातीच्या लोकांना उच्च जातीचे लोक आपल्या विहिरीवर व पाणवठ्यावर पाणी भरू देत नसत. जोतीबा व सावित्रीबाई यांनी आपल्या घरातील पाण्याचा हौद त्या लोकांना खुला केला. सावित्रीबाई समाजाच्या खंद्या कार्यकर्त्या होत्या. समाजाने पुरोहित नाकारून साध्या पद्धतीचे, हुंड्याशिवायचे, कमी खर्चातले विवाह लावायचा कार्यक्रम हाती घेतला. पहिला विवाह दि. २५ डिसेंबर १८७३ रोजी लावण्यात आला नंतर ही चळवळ देशव्यापी झाली. सावित्रीबाईंची मैत्रिण बजूबाई ग्यानोबा निंबणकर यांची कन्या राधा आणि फुल्यांचे कार्यकर्ते सीताराम जबानी आल्हाट यांचा हा विवाह होता. या ऐतिहासिक विवाहाचा खर्च सावित्रीबाईनी स्वतः केला. या विवाहांना भटजींनी देशभर विरोध केला. दि. ४ फेब्रुवारी १८८९ रोजी वयाच्या १६ व्या वर्षे त्यांनी आपल्या दत्तक पुत्राचा विवाहही याच पद्धतीने केला. हा भारतातला आधुनिक काळातला पहिला आंतरजातीय विवाह होय. त्याकाळी सरकारवर सतीची चाल बंद करण्याविषयीची कायदा करावा म्हणून सावित्रीबाई व जोतिबा यांनी दबाव आणला.

सन १८९६ साली पुन्हा दुष्काळ पडला. सावित्रीबाईंच्या नेतृत्वाखाली सत्यशोधक समाजाचे मंडळ गव्हर्नरांकडे गेले. सरकारने मग दुष्काळी कामे काढली. शेतकऱ्यांना साऱ्यात सूट मिळावी म्हणून सावित्रीबाईंनी खूप खटपट केली. सावित्रीबाईंच्या कार्याचे महत्त्व ओळखून पंडिता रमाबाईनी त्यांना आर्थिक मदत दिली. बडोद्याच्या सयाजीरावांनी धान्य–कपडे–पैसा पाठविला.

जोतिबांची जीवनयात्रा संपली. अंतिम संस्काराच्या मुद्द्यावरूनच फुलेंच्या कुळातील लोकांनी वादळ निर्माण केले. 'जोतिबांचा अंत्यसंस्कार करण्याचा अधिकार आम्हालाच आहे. आम्ही त्यांच्या कुळातील आहोत. यशवंत, फुले कुळात जन्मला नाही म्हणून त्याला तो अधिकार नाही, अशी फुलेंच्या कुळातील लोकांनी भूमिका घेतली. त्यावेळी सावित्रीने कणखर भूमिका घेतली.

१८९७ साली महाराष्ट्रात प्लेग रोगाची मोठी साथ आली होती. या साथीत अनेकजण दगावले. सावित्रीबाईंनी आपले दत्तक चिरंजीव यशंवत यांची मदत घेतली. दीन–दलितांना दवाखान्यात नेले व त्यांची सेवा सावित्रीबाईंनी केली. एक दलित मुलगा या रोगाने पछाडलेला होता. ते पाहून माऊलीने त्यास खांद्यावर घेतले. दवाखान्यांकडे त्या निघाल्या. पण खुद्द त्यांनाच त्याची लागण झाली. आपला संसार न करता पीडित व दीनदलितांसाठी सावित्रीबाई राबल्या; अगदी आपल्या शेवटच्या क्षणापर्यंत.

# स्त्री मुक्ती आंदोलनाच्या प्रणेत्या ;सावित्रीबाई फुले

महाराष्ट्राच्या पुरोगामी इतिहासात सावित्रीबाई फुले यांनी केलेले शैक्षणिक, सामाजिक व वाङ्मयीन कार्य अत्यंत महत्वपूर्ण आहे. समाजातील अज्ञान, अंधकार दूर करण्यासाठी शिक्षण हा उत्तम उपाय असल्याचे ओळखून त्यांनी आपल्या कार्याला सुरुवात केली. जोतीरावांच्या कार्याच्या प्रेरणेने प्रेरित झालेल्या सावित्रीबाई आयुष्यभर सामाजिक कार्य करीत राहिल्या. सावित्रीबाई केवळ शाळा काढून थांबल्या नाहीत तर पुरोगामी धोरण स्वीकारून त्यांनी अस्पृश्यतेवर हल्ला चढविला.

भारतीय समाजाने स्त्रियांना शिक्षणापासून व समतेपासून वंचित ठेवले होते. व्यक्तीच्या जीवन विकासासाठी शिक्षण आवश्यक असून ते सर्व सुधारणांचे मूळ असल्याचे जोतीराव व सावित्रीबाईंनी जाणले होते. तत्कालीन परिस्थितीत स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार नाही. त्यांना शिक्षण देणे म्हणजे देव, धर्म व समाज यांच्याविरुद्ध वर्तन करणे असे मानले जाई. या सर्वावर मात करण्यासाठी सावित्रीबाई व जोतिरावांनी शिक्षणाचे कार्य हाती घेतले. स्त्रीशिक्षण व त्याच्याबाबत सुधारणा चिरंतन होण्यासाठी त्याची सुरुवात घरापासून करण्याचा आग्रह त्यांनी धरला. जोतिरावांनी सावित्रीबाईंच्या सहकार्याने पुण्यातील बुधवार पेठेतील भिडयांच्या वाड्यात दि.१ जानेवारी, १८४८ रोजी मुलींची पहिली शाळा सुरू केली. या शाळेने भारतीय स्त्री शिक्षणाचा पाया घातला गेला. या शाळेमध्ये पहिल्या शिक्षिका व पहिल्या मुख्याध्यापिका म्हणून सावित्रीबाई कार्य करू लागल्या.


**डॉ. पल्लवी कोडक**
**श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर**

सावित्रीबाईंनी शिक्षण कार्य पार पाडत असताना मुलांना मानसिकदृष्ट्या संवेदनशील बनविण्यावर भर दिला. केवळ पुस्तकी ज्ञान न देता व्यावहारिक दृष्टिकोनातून विद्यार्थ्यांचा विकास घडविण्यावर त्यांनी भर दिला. काळाला अनुरूप असे काही शैक्षणिक प्रयोगही केले. शूद्रांच्या मुलांची शाळा स्वतः सावित्रीबाई व फातिमा शेख चालवीत. तर ब्राह्मण मुलींची शाळा चालवण्यासाठी ब्राह्मण शिक्षकाचीच निवड केली. तेव्हा ब्राह्मण मुलींचीच अधिक प्रगती झाल्याचे दिसून आले. अस्पृश्यांच्या मुलांना शिक्षण देणारा शिक्षक जर त्याच समाजातील असेल तर अत्यंत तळमळीने आपले कार्य करेल. या मुलांना शिक्षण देताना त्यांच्या मूलभूत गरजाकडेही लक्ष देण्यावर त्यांनी भर दिला.

सावित्रीबाईंच्या कार्याविषयी धनंजय कीर म्हणतात, एकोणिसाव्या शतकात स्त्रियांच्या उद्धारासाठी सावित्रीबाईसारखे आदर्श नि उदात्त उदाहरण क्वचितच आढळून येईल. जोतिरावांच्या काळात समाज राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक अशा सर्व पातळीवर गुलामगिरीच्या बंधनात जखडला होता. समाजव्यवस्थेत शूद्र, अतिशूद्र यांना दिली जाणारी हीन वागणूक, शेतकरी व शेतमुजरांचा होणारा छळ, बालविवाहाची प्रथा, विधवांचे प्रश्न, सतीची चाल, केशवपण या सामाजिक प्रश्नाकडे फुले दांपत्याने लक्ष वेधले. विधवा स्त्रियांच्या जीवनात पुन्हा आनंद निर्माण होण्यासाठी फुले दांपत्याने विधवा पुनर्विवाहाचा पुरस्कार केला. सावित्रीबाईनी 'विधवा पुनर्विवाह' या संस्थेची स्थापना करून यामध्ये प्रौढ स्त्रियांचे प्रश्न, विधवा स्त्रियांचे प्रश्न, त्यांचा समाजाकडून होणारा अवमान, स्त्रियांचे शिक्षण इत्यादी विषयावर चर्चा याठिकाणी होत असे. सावित्रीबाईनी आपल्या घराशेजारी बालहत्या प्रतिबंधक गृह व प्रसूतिगृह स्थापन केले. या संदर्भातील माहिती देणारी भित्तिपत्रके वाटण्यात आली. घराघरावर लावण्यात आली. सावित्रीबाई व जोतिबा यांच्या अशा कार्यामुळे सनातली खवळले. त्यांनी धर्म बुडाला म्हणून अकांडतांडव केले. मात्र फुले दांपत्याने मोठ्या दूरदृष्टीने आपले कार्य चालू ठेवले.

सन १८१८ पेशवाईचा अंत झाला. पुढे इंग्रजांनी न्यायव्यवस्थेत समानतेचे तत्व स्विकारल्याने फुले दांपत्याने त्यांचे स्वागत केले. शूद्रातिशूद्रांची सामाजिक व आर्थिक गुलामगिरीतून मुक्तता करण्याचे कार्य त्यांनी हाती घेतले. सावित्रीबाई या जशा थोर समाजसेविका, उत्तम अध्यापिका होत्या. त्याचप्रमाणे बुद्धिमान लेखिका व प्रतिभाशाली कवयित्री होत्या. त्यांची साहित्यरचना– काव्यफुले, बावनकशी सुबोध रत्नाकर, जोतिबांची भाषणे : भाग १ ते ४, जोतिरावांना सावित्रीबाईंनी लिहिलेली पत्रे, सत्यशोधक परिषदेच्या अध्यक्षा म्हणून व अनेक ठिकाणी विविध विषयावर केलेली भाषणे.

सावित्रीबाईंच्या जीवन कार्याचा विचार करता अत्यंत प्रतिकूल कालखंडात त्यांनी स्वतः शिक्षण घेऊन दीनदलित व स्त्रियांसाठी सामाजिक कार्य करण्याकामी त्या बाहेर पडल्या. स्त्री शिक्षण, अस्पृश्यांचे शिक्षण, बालहत्या प्रतिबंधक गृह, विधवा विवाह, केशवपन बंदी इत्यादी सुधारणा केल्या. सनातन्यांच्या प्रखर विरोधाला व छळाला न जुमानता आपल्या कार्यात त्या यशस्वी झाल्या. सावित्रीबाईंनी शैक्षणिक व सामाजिक कार्याबरोबर गद्य–पद्य अशा स्वरूपात लेखन केले. आपल्या लेखनाच्या माध्यमातून समाजाचे विदारक चित्र त्यांनी रेखाटले. सावित्रीबाई जोतीराव यांच्या फक्त अर्धांगिनी नव्हत्या तर जोतिरावांची प्रेरणा आणि जोतीराव सावित्रीबाईंची प्रेरणा होते. सावित्रीबाई या भारतातील पहिल्या शिक्षका, मुख्याध्यापिका, स्त्रीशूद्र अनाथांच्या



माता आणि स्त्रीमुक्ती आंदोलनाच्या प्रणेत्या होत्या. सावित्रीबाईंनी आपल्या आचार–विचारांनी आणि मूलगामी समाज परिवर्तनाच्या कार्याने भारताच्या इतिहासात एक नवा आदर्श निर्माण केला. हाच आदर्श आजच्या पिढीने घेऊन सावित्रीबाईंचे कार्य पुढे नेण्याची भूमिका घेतली पाहिजे. सावित्रीबाईंच्या कार्याचा विचार केला असता आजच्या तंत्रज्ञानाच्या काळातील शिक्षणाबाबत चिंतन करणे गरजेचे वाटते. प्राथमिक शिक्षणाची झालेली अवस्था, शासनाची शैक्षणिक धोरणबद्दलची भूमिका या सर्वाबद्दलही विचार करण्याची आज गरज आहे असे मला वाटते. अखेरीस सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांना विनम्र अभिवादन !

हे पत्र संपादक, मालक, प्रकाशक श्री.शशिकांत आकाराम पाटील यांनी प्रीतिसंगम प्रिंटर्स, कोयना औद्योगिक वसाहत, मलकापूर–कराड येथे छापून गोदावरी प्लाझा, हेड पोस्टाजवळ, शनिवार पेठ कराड, येथे प्रसिद्ध केले आहे. या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. R.N.I.No.MAHMAR./२००१/१०३३८ रजिस्टर No.MAHMAR/14511/13/1/96/Te पोस्ट परवाना No./KRDDN/008/2024-2026 *मुख्य कार्यालय:– गोदावरी प्लाझा, हेड पोस्ट जवळ, शनिवार पेठ कराड, जि.सातारा, पिनकोड – ४१५११० फोन (०२१६४)२२७७२५,,फॅक्स २२६९२५, * सातारा कार्यालय:– संजीवन सीटी स्कॅन शेजारी, सिव्हील हॉस्पिटल रोड, सातारा फोन नं:–९२२६३९८८१७ RNI.mar/२००१/१०३३८.
email-pritisangamkarad@gmail.com

# पाटण आगाराकडून दिवशी बुद्रुक गावावर अन्याय

## पूर्वपार चालत आलेल्या गाड्या केल्या बंद ; ग्रामस्थ आंदोलनाच्या पवित्र्यात

**मल्हारपेठ/प्रतिनिधी:**

पाटण तालुक्यातील दिवशी बुद्रुक गावावर पाटण आगाराकडून अन्याय केला जात असून गेले अनेक वर्ष प्रवाशांना सेवा देणाऱ्या गाड्या अचानक पणे बंद करण्यात आल्या आहेत. तर गेले अनेक महिने वारंवार ग्रामपंचायत कडून पत्रव्यवहार करून मागणी करून देखील गाडी सुरू करण्याबाबत कोणतीही हालचाल होत नसल्याने नाराजीचा सूर उमटत आहे. दरम्यान दिवशी बुद्रुक मधील ग्रामस्थ आता आंदोलनाच्या पवित्र्यात आहेत.

दिवशी बुद्रुक गावाला अपवाद वगळता प्रवासी वाहनाची सुविधा फारच कमी आहे. दिवशी बुद्रुक मधून पाटण अथवा ढेबेवाडी कडे जावयाचे असल्यास सुमारे दोन ते अडीच किलोमीटरची पायपीट करून गाडी पकडावी लागते. तर कराडला जाण्यासाठी सुमारे चार किलोमीटरची पायपीट करून मारूल हवेली येथून एसटी बस किंवा खाजगी प्रवासी वाहतुकीने निसरे फाटा येथे जाऊन गाडी पकडावी लागते. दिवशी बुद्रुक गावाला गेले अनेक वर्ष सकाळी आणि सायंकाळी पाटणवरून सुटणारी पाटण– दिवशी ही गाडी सुरू असायची तर पाटण आगाराचीच कराडवरून सुटणारी कराड – दिवशी ही गाडी मुक्कामी असायची. गेली अनेक वर्ष पिढ्यान पिढ्या सेवा देणाऱ्या या गाड्या पाटण आगाराने वेगवेगळी कारणे सांगत टप्प्याटप्प्याने पूर्णपणे बंद केल्या आहेत. पूर्वी गावातून खाजगी प्रवासी वाहतूक चालत होती, मात्र एसटी सुरू राहावी यासाठी अनेक वेळा खाजगी प्रवासी वाहतूक बंद करून एसटीच कशी सुरू राहील यासाठी ग्रामस्थांनी वेळोवेळी प्रयत्न केले होते. मात्र कालांतराने खाजगी प्रवासी वाहतूक देखील बंद झाली तर एसटीने देखील सेवा देण्याकडे पाठ फिरवल्याने दिवशी गावावर एक प्रकारचा अन्याय केला जात आहे . दिवशी बुद्रुक मधून पाटणकडे व कराडकडे दररोज शालेय तसेच महाविद्यालयीन शिक्षण घेण्यासाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या मोठी आहे. त्याचबरोबर गावातून अनेक प्रवासी कामाच्या निमित्ताने प्रवास करत असतात. मात्र एसटीची सुविधा नसल्याने सर्वांचेच अडचण होत आहे. महाराष्ट्र शासनाने महिलांसाठी महिला सन्मान योजना अंमलात आणली असून महिलांना प्रवासात अर्धे तिकीट सवलत देण्यात आली आहे. मात्र दिवशी बुद्रुक मधील महिलांना शासनाच्या महिला सन्मान योजनेचा लाभ मिळत नसून त्यांना मोठी पायपीट करून वेळप्रसंगी ज्यादा पैसे खर्च करून प्रवास करावा लागत आहे. त्यामुळे विद्यार्थी असो किंवा सर्वसामान्य जनता व महिला या सर्वांनाच पाटण आगाराच्या आडमुठ्या धोरणाचा त्रास सहन करावा लागत आहे.

दिवशी बुद्रुक ग्रामपंचायतच्यावतीने एसटी सेवा सुरू करण्यासाठी वारंवार पाटण आगाराकडे पाठपुरावा केला आहे. मात्र पाटण आगार प्रशासनाने या अर्ज विनंत्यांना केराची टोपली दाखवली आहे. केवळ गाडी सुरू करतो एवढेच आश्वासन देऊन प्रत्यक्षात गाडी सुरू करण्याबाबत चाल ढकल सुरू ठेवली आहे. पाटण आगाराने तातडीने एसटी बस सेवा सुरू न केल्यास भविष्यात रस्ता रोको आंदोलन करण्याचा तयारीत ग्रामस्थ व महिला आहेत.

पाटण आगाराची कराड होऊन सुटणारी आणि दिवशीला मुक्काम असणारी कराड – दिवशी ही गाडी गेल्या काही महिन्यापासून दिवशी वरून कराडला न जाता दिवशी वरून सकाळी पाटणला सुरू केली मात्र गावांमध्ये येणारे चाकरमाने तसेच मुंबई पुण्याला जाणारे अनेक प्रवासी त्याचबरोबर औषध उपचार व इतर सुविधांसाठी कराडला जाणारे सर्वच प्रवासी यांची मोठी अडचण झाली आहे सकाळी लवकर गाडी नसल्याने अनेकांना खाजगी वाहतूकीने नवा रस्ता अथवा निसरे फाटा येथे येऊन पुढील कामास करावा लागत आहे त्यामुळे नाहक वेळ जात असून आणि आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे.



# कुस्ती सरावानंतर १४ वर्षीय मुलाचा हार्ट अटॅकनं मृत्यू

**सातारा/प्रतिनिधी:**

माण तालुक्यातील मलवडी गावच्या १४ वर्षीय मुलाचा कुस्ती सरावानंतर हार्ट अटॅकनं मृत्यू झाला आहे. जय दीपक कुंभार, असं दुर्दैवी मुलाचं नाव असून तो पुण्यातील जाणता राजा कुस्ती संकुलात कुस्तीचा सराव करत होता. या घटनेनं त्याच्या कुटुंबाला जबर धक्का बसला आहे. तसंच कुस्ती क्षेत्रावरही शोककळा पसरली आहे.

मुलाला नामवंत मल्ल बनविण्याचं स्वप्न भंगलं : मलवडी (ता. माण) गावातील दीपक कुंभार यांनी जय या आपल्या एकुलत्या एका मुलाला नामवंत मल्ल बनविण्याचं स्वप्न पाहिलं होतं. त्या ध्येयानेच त्यांनी मुलाला सरावासाठी पुण्यातील जाणता राजा कुस्ती संकुलात दाखल केलं होतं. ७ ऑगस्ट २०१० रोजी जन्मलेल्या जय याने मलवडी, आंधळी येथे सराव करताना कुस्तीत चुणूक दाखवली होती. स्थानिक कुस्ती मैदानात तो नावलौकीक मिळवत होता.

# सातारा जिल्हाधिकारीपदी संतोष पाटील

**पान १ वरुन** दरम्यान, आज राज्य शासनाने काढलेल्या परिपत्रकानुसार डूडी यांची बदली पुणे जिल्हाधिकारी पदावर करण्यात आली आहे. त्यांच्या जागेवर पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष पाटील यांची सातारा जिल्हाधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. संतोष पाटील मूळचे उंडेगाव ता बार्शी येथील आहेत १९९६ मध्ये उपजिल्हाधिकारी यवतमाळ म्हणून त्यांनी आपल्या कारकिर्दीची सुरवात केली . २०१६ ते २०१८ मध्ये नांदेडचे अतिरिक्त जिल्हाधिकारी , २०२० मध्ये पुणे विभागीय आयुक्त कार्यालयात उपायुक्त पदाची जवाबदारी तर मार्च २०२ ४ पासून ते पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी म्हणून कामकाज पहात होते. राज्य शासनाच्या सामान्य प्रशासनाने डुडी यांच्या बदलीचे काढलेले आदेश जिल्हा प्रशासनाला अप्पर सचिव व्ही राधा यांच्या आदेशाने प्राप्त झाले आहेत. डुडी लवकरच पुणे जिल्हयाची तर संतोष पाटील सातारा जिल्हाधिकारी पदाची सूत्रे स्वीकारतील अशी माहिती देण्यात आली आहे.

# वेळेवर उपचार न मिळाल्याने साताऱ्यात तरुणाचा मृत्यू

## हॉस्पिटल समोर नातेवाईकांचा ठिय्या सातारा शहर पोलिसांचा हस्तक्षेप

**सातारा/प्रतिनिधी:**

येथील मंगलमूर्ती हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी आलेल्या रुग्णाला वेळेवर व योग्य उपचार न मिळाल्याचा आरोप मयत रुग्णांच्या नातेवाईकांनी करत हॉस्पिटल प्रशासनाला धारेवर धरले. अक्षय नलावडे (वय २६ राहणार बोगदा परिसर) असे युवकाचे नाव आहे. यामुळे येथे तणावाचे वातावरण निर्माणझाले होते सातारा पोलिसांनी घटनास्थळी येऊन हस्तक्षेप केल्याने परिस्थिती नियंत्रणात आली याप्रकरणी एका डॉक्टरला ताब्यात घेण्यात आले आहे.

सातारा शहरातील मंगलमूर्ती क्लिनिक अँड रिसर्च सेंटर येथे अक्षय नलावडे वय २६ याचा मृत्यू झाला.

या घटनेमुळे अक्षयच्या नातेवाईकांमध्ये अस्वस्थतेचे वातावरण होते अक्षय वर गेल्या काही दिवसापासून या हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू होते. दिनांक २७ रोजी त्याला डिस्चार्ज देण्यात आला परंतु बुधवारी पुन्हा त्याला त्रास होऊ लागल्याने सकाळी हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते डॉक्टरच्या हलगर्जीपणामुळे अक्षयला आपले प्राण गमवावे लागले आहे. आक्रमक झालेल्या संबंधित नातेवाईकांनी हॉस्पिटलमध्ये प्रशासनाला धारेवर धरले संबंधित डॉक्टरवर गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी केली. हॉस्पिटलच्या गोंधळाची खबर मिळताच सातारा शहर पोलीस तात्काळ घटनास्थळी दाखल झाले त्यांनी परिस्थिती नियंत्रणात आणत जमावाला शांत केले.



तसेच या प्रकरणी एका डॉक्टरला चौकशीसाठी ताब्यात घेण्यात आल्याची माहिती आहे. दवाखान्या बाहेर लोकांनी गर्दी केल्यामुळे साताऱ्यात उलट सुलट चर्चांना सुरुवात झाली. डॉक्टरवर जोपर्यंत गुन्हा दाखल होत नाही तोपर्यंत शव पोस्टमार्टम साठी नेणार नाही असे भूमिका नातेवाईकांनी घेतली पोलिसांनी लवकरात लवकर संबंधित डॉक्टरवर कायदेशीर कारवाई करावी. अशी संतप्त जमावाची मागणी होती पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार डॉक्टर भूषण पाटील यांना अटक करण्यात आली. आहे. पोलीस अधिक तपास करत असून तपासानंतर खरी परिस्थिती सगळ्यांच्या समोर येणार आहे.

# फटाका गोदामाला आग दुर्घटनेनंतर प्रशासन ॲक्शन मोडवर

## आईच्या मृत्यूस कारणीभूत दत्तात्रय तारळकर यांच्यावर गुन्हा दाखल

**विटा/प्रतिनिधी:**

विटा येथील यशवंत नगर मधील साई कापड दुकान बाजूस भर वस्तीमध्ये असणाऱ्या भाजपचे विटा शहराध्यक्ष दत्तात्रय तारळकर यांच्या होलसेल फटाक्याच्या गोडाऊनला दुपारी २.३० च्या सुमारास अचानक भीषण आग लागली. या आगीत दत्तात्रय तारळकर यांच्या आईचा होरपळून मृत्यू झाला. फटाका गोदामाला लागलेल्या या आग दुर्घटनेनंतर प्रशासन ॲक्शन मोडवर आले.

सदर आईच्या मृत्यूस कारणीभूत झाल्याप्रकरणी दत्तात्रय तारळकर यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच बेकायदेशीरपणे घरातच फटाक्यांचा साठा करणाऱ्या दत्तात्रय तारळकर यांच्यावर मोठी कारवाई करण्यात आली. याप्रकरणी मंडल अधिकारी संजय पाटील यांची दत्तात्रय तारळकर यांच्या विरोधात विटा पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली. विटा शहरात या घडलेल्या मोठ्या घटनेनंतर व दत्तात्रय तारळकर यांच्यावरील कारवाईनंतर अन्य फटाका स्टॉल धारकांचे धाबे दणाणले आहेत तर अन्य फटाका स्टॉल प्रशासनाच्या रडारवर असल्याचे समजले. यानंतर नागरी हक्क संघटनेच्या सुनील सुतार यांनी विट्यातील अवैद्य फटाका गोदाम व स्टॉल बाबत प्रशासकास धारेवर धरले. विटा शहरात अनेक ठिकाणी असे मध्यवर्ती ठिकाण फटाकाचे स्टॉल असल्याचे सांगत सुतार यांनी अनेक वेळा आम्ही यासंदर्भात वरिष्ठ अधिकारी यांच्याकडे तक्रार केल्याची ही सांगितले.

विटा शहरात कोणत्या कोणत्या ठिकाणी फटाके विक्री व गोदाम असल्याचे हे सुद्धा आम्ही या प्रशासकाला दाखवून दिले होते. पण यावर कोणतीच कारवाई झाली जाई. विटा शहरातील असे बरेच ठिकाण असल्याचे जिथे विना प्रमाणा त फटाका विक्री केली जात असल्याचेही नागरी हक्क संघटनेचे सुनील सुतार यांनी आवाज उठवत आता तरी प्रशासक यावर ठोस पावले उचलणार का? यावेळी सुनील सुतार म्हणाले, हा फटाकाचा स्फोटची



विटा शहरात तिसरी घटना आहे. विटा शहरातील सांगली रोड येथील फटाका गोदामला आग लागून तिथेही दोन ते तीन जण गंभीर जखमी झाले होते. तर विटा शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौका पासून काही अंतरावर एका मेडिकल दुकानांमध्ये फटाका विक्री केली जात होते. तेव्हाही अशीच आग लागून मोठी दुर्घटना घडली होती मात्र या दुर्घटनेत कोणतीही जीवित हानी झाली नव्हती. तसेच गणेश पेठ. व पंचमुखी गणपती मंदिरासमोरील फटाका विक्रीचे स्टॉल असल्याचे सांगत अशा खुल्या विक्री करणाऱ्या फटाका स्टॉलवर कारवाई प्रशासकाने करावी अशी मागणी त्यांनी केली.

मागील दोन दिवसांपूर्वी विटा शहरातील एका फटाक्यांच्या गोदामाला भरदुपारी लागलेल्या आगीमुळे भाजपचे विटा शहराध्यक्ष आणि फटाका स्टॉलचे मालक दत्तात्रय तारळकर यांच्या मातोश्री कलावती शिवदास तारळकर .( वय वर्षे ८६) ही वृद्ध महिला हीचा होरपळून मृत्यू झाला.तर दत्तात्रय शिवदास तारळकर ( वय वर्षे ५६), मानसी शंकर पवार, योगिता शंकर पवार (वय वर्षे ३०), दिपाली दत्तात्रय तारळकर( वय वर्षे २८). वर्षा दत्तात्रय तारळकर ( वय वर्षे ५२). कल्पना विजय जाधव (वय वर्षे ३७) हे सर्वांजन रहाणार विटा गंभीर जखमी झाले आहेत. तर या आगीत गो गोडाऊनमधील फटाक्यांचा स्टॉक जळून खाक झाला आहे. या घटनेनंतर पोलीस प्रशासन व प्रशासकीय अधिकारी हे मात्र आता क्शन मोडवर आले आहेत.

# शोध मराठी मनाचा जागतिक संमेलनाचे आयोजन


## १० जानेवारी रोजी खासदार शरद पवार यांच्या हस्ते उद्घाटन

**सातारा/प्रतिनिधी:**

जागतिक मराठी अकादमी व रयत शिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने साताऱ्यात दिनांक १० ते १२ जानेवारी दरम्यान शोध मराठी मनाचा जागतिक संमेलन होणार आहे. याचे उद्घाटन खासदार शरद पवार यांच्या हस्ते होणार असल्याची माहिती जागतिक मराठी अकादमीचे अध्यक्ष रामदास फुटाणे व रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन व स्वागत अध्यक्ष चंद्रकांत दळवी यांनी पत्रकार परिषदेत दिली

यावेळी रयत शिक्षण संस्थेचे सचिव विकास देशमुख, शिवलिंग मेनकुदळे, एडवोकेट भगीरथ शिंदे, राजेंद्र मोरे, इत्यादी यावेळी उपस्थित होत.

फुटाणे पुढे म्हणाले, शोध मराठी मनाचा जागतिक संमेलनामध्ये विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे .शुक्रवार दिनांक दहा रोजी दुपारी एक वाजता सांस्कृतिक कार्यक्रम दुपारी दोन वाजता लक्ष्मीची पावले हा कार्यक्रम होणार आहे यामध्ये हनुमंत गायकवाड रामदास माने सहभागी होणार आहे दुपारी तीन वाजता समुद्रापलीकडे या कार्यक्रमात गणेश ठकार प्राजक्ता वसई अनिल नेरुळकर प्रसाद वझे सचिन जोशी नेपोलियन शिंदे सहभागी होणार आहेत .सायंकाळी पाच रोजी जागतिक संमेलनाचे उद्घाटन पद्मभूषण खासदार शरद पवार यांच्या हस्ते होणार असून संमेलनाचे अध्यक्ष जेष्ठ साहित्यिक डॉक्टर आ.ह साळुंखे



आहेत यावेळी सार्वजनिक बांधकाम मंत्री छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले व सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांचे प्रमुख उपस्थिती आहे जागतिक मराठी भूषण पुरस्कार हनुमंत गायकवाड जागतिक मराठी गौरव पुरस्कार राजीव खांडेकर यांना देण्यात येणार आहे.

दिनांक ११ जानेवारी रोजी सकाळी साडेनऊ वाजता मुक्काम पोस्ट सातारा या कार्यक्रमात अभिनेते सयाजी शिंदे किरण माने संतोष पाटील इत्यादी कलावंत सहभागी होणार आहे. सकाळी ११ वाजता आकाशाची जडले नाते या कार्यक्रमात अहिल्यानगरच्या नीलम इंगळे व अमेरिकेचे आमोद केळकर सहभागी होणार आहेत. दुपारी बारा वाजता अभिजात मराठी आणि माध्यमे या विषयावर डॉक्टर सदानंद मोरे अध्यक्ष साहित्य संस्कृती मंडळ, नितीन ठाकरे नाशिक , चंद्रकांत दळवी रयत शिक्षण संस्था चेअरमन, जगन्नाथ पाटील बेंगलोर व मसापाचे कार्याध्यक्ष मिलिंद जोशी सहभागी होणार असून त्यांचे विचार व्यक्त करणार आहेत दुपारी तीन वाजता आधारवड या कार्यक्रमात डॉक्टर भरत केळकर डॉक्टर गिरीश कुलकर्णी व डॉक्टर विश्वास सापडणेकर उपस्थित राहतील सायंकाळी साडेपाच वाजता चित्र शिल्पकार्य या प्रकारात मंदार लोहार सातारा, सचिन खरात सोलापूर, कवी शिंदे विठ्ठल वाघ, अशोक नायगावकर वाई, नितीन देशमुख, मीनाक्षी पाटील, अंजली कुलकर्णी, वैशाली पतंगे, भूषण कुलकर्णी, प्रशांत शानबाग योगेश नेर समीर जीरांगलीकर इत्यादी मान्यवर उपस्थित राहणार आहेत सायंकाळी सात वाजता सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे

रविवार दिनांक १२ जानेवारी रोजी सकाळी साडेनऊ वाजता कृत्रिम बुद्धिमत्ता व सायबर सुरक्षा या विषयावर विवेक सावंत पुणे मंगेश आमले मुंबई व रवींद्रनाथ हि रोळीकर पुणे यांचे व्याख्यान होणार आहे सकाळी अकरा वाजता कृपया व डॉलर बिटकॉइन या विषयावर विद्याधर अनास्कर पुणे डॉक्टर नीरज हातेकर वाई जयराज साळगावकर मुंबई यांचे व्याख्यान होणार आहे संमेलनाच्या समारोपाला साताऱ्याचे खासदार उदयनराजे भोसले व कवी चित्रपट निर्माता दिग्दर्शक नागराज मंजुळे यांची प्रमुख उपस्थिती आहे

# समाजात बंधुता रुजवण्यासाठी एकदिलाने ...

**पान १ वरुन**

देशाच्या फाळणीच्या वेळी सुद्धा बाबासाहेबांनी इस्लाम चा धोका वारंवार सांगितला होता. फाळणीविषयी कठोर भूमिका त्यांनी मांडली होती. त्यावर तत्कालीन काँग्रेस नेत्यांनी दुर्लक्ष केल्याने आज बांगलादेश सारख्या ठिकाणी हिंदू, बौद्ध बांधवांवर अत्याचार होत आहेत. कलम ३७० सारख्या विषयात सुद्धा डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी घेतलेल्या राष्ट्रनिष्ठ भूमिकेमुळेच आज भारत सरकार ते कलम हटवू शकले. धर्म परिवर्तन करत असताना डॉ बाबासाहेबांनी भारतीय परंपरेतील बौध्द धर्मच का स्वीकारला याचा विचार आपण सर्वांनी करायला हवा. बंधुतेसाठी हिंदू समाजाने डॉ.आंबेडकर समजून घेतले पाहिजे. असे मत ड विजय गव्हाळे यांनी व्यक्त केले.

परिषदेची सर्वात बुद्ध वंदनेने झाली. कार्यक्रमाचे संयोजन लोककल्याण मंडळ ट्रस्ट चे अध्यक्ष विजय जोशी यांनी केले. सूत्रसंचालन वैभव डुबल, प्रास्ताविक भरत आमादापुरे, तर परिसंवादाचे संचालन निलेश अलाटे यांनी केले. श्रीकांत एकांडे यांनी आभार मानले. यावेळी आमदार अतुल भोसले, विविध चळवळीतील कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

# राहत्या घरातून युवती बेपत्ता

**सातारा/प्रतिनिधी:**

राहत्या घरातून एक युवती बेपत्ता झाल्याची फिर्याद सातारा तालुका पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, सातारा तालुक्यातील एका गावात राहणारी एक २१ वर्षीय युवती राहत्या घरातून कॉलेजला जाते असे सांगून निघून गेली आहे. अधिक तपास पोलीस हवालदार कुमठेकर करीत आहेत.

# रस्त्यावरील स्पीड ब्रेकरमुळे एकाला जीवदान मिळाले

## डॉक्टरांनी मयत घोषित केले आणि स्पीड ब्रेकर ने जीवदान दिले

**विटा/प्रतिनिधी:**

खरच कधी काय घडेल हे सांगता येत नाही आणि देव कोणत्या ना कोणत्या रूपात येईल हे सुद्धा कळन कठीणच आहे. पण कधी कधी अस वाटत कुठं आहे देव आणि कधी कधी वाटतं खरच आहे देव. खरंतर सत्य व सविस्तर माहिती अशी की कोल्हापूर शहरातील कसबा बावडा या शहरांमध्ये राहणाऱ्या या परिसरातील पांडुरंग उलपे (वय वर्षे ६५) यांना अचानक चक्कर व शरीराला एक धक्का बसल्याने ते बेशुद्धावस्थेत पडले. त्यांच्या हालचाली बंद झाल्या घरातील नातेवाईकांना अक्षरशः काहीच कळेना काय झाले.

त्यांना तातडीने जवळजवळ आसलेल्या एका हॉस्पिटलमध्ये त्यांना घटनास्थळावरून हलवण्यात आले. तिथे पांडुरंग उलपे यांना डॉक्टरांनी तातडीने तपासणी व उपचारासाठी घेतले असता मात्र डॉक्टरांनी ते मयत झाल्याचे त्यांच्या नातेवाईकांना घोषित केले. जिकडे तिकडे त्यांनी पाहुणे नातेवाईक यांना या संदर्भात कळवले तर अंत्यसंस्काराची तयारी




करायला पुढे सांगितली. आणि दुःखाचा डोंगर उलपे परिवारावर कोसळला. मयत पांडुरंग उलपे यांना म्बुलन्स मधून कोल्हापूर कसबा बावडा येथे पांडुरंग उलपे यांना घरी घेऊन जाताना याचवेळी एक चमत्कार घडला का देवच मदतीला धावून आला रस्त्यावर असणाऱ्या स्पीड ब्रेकर या ब्रेकरवर हॉस्पिटल मधून म्बुलन्स मधून उलपे यांना घेऊन जाताना ती म्बुलन्स एका स्पीड ब्रेकर वर जोराने आदळली आणि अक्षरशा: देवा घरी गेलेले पांडुरंग उलपे यांना अचानक जीवदान मिळून आले स्पीडब्रेकर वर म्बुलन्स आदळल्यानंतर त्यांच्या बोटाची हालचाल सुरू झाली.

तातडीने पुन्हा तीच म्बुलन्स हॉस्पिटल कडे रवाना करण्यात आली. म्हणतात ना देव तारी त्याला कोण मारी. खरंच कोणत्या रूपाने परमेश्वर उलपे परिवाराच्या पाठीशी उभा राहिला आणि देवा घरी गेलेले पांडुरंग उलपे यांना जीवदान दिले. ही चर्चा संपूर्ण कोल्हापूर परिसरातील कसबा बावडा येथे नागरिकांतून होत होती.


## जाहीर नोटीस

### कडेगांव येथील मे.उपविभागीय अधिकारीसाो,यांचे न्यायालयात

क्र.एम.एजी.कावि/७५/२०२४
दिनांकः–३१/१२/२०२४

सतिश जगन्नाथ पवार
रा.शिरसगाव,ता.कडेगांव, जि.सांगली — अर्जदार

**विरूद्ध**

ग्रामसेवक (ग्रामविकास अधिकारी)
ग्रामपंचायत शिरसगाव,
ता.कडेगांव जि.सांगली — जाबदार

**जन्म व मृत्यू नोंदणी अधिनियम कायदा १९६९ चे कलम १३ (३) अन्वये जन्म/ मृत्यूची नोंद होऊन दाखला मिळणेबाबत**

ज्याअर्थी अर्जदार मतिश जगन्नाथ पवार यांचा मुलगा श्रीराज सतिश पवार यांचा जन्म दि. १३/०५/२०११ रोजी शिरसगाव ता. कडेगांव जि.सांगली येथे झालेला आहे. अर्जदारचे कुटुंबातील लोक हे कायद्याचे बाबतीत अडाणी अशिक्षीत लोक असलेने श्रीराज सतिश पवार यांचा जन्म नोंद निबंधक जन्म मृत्यू विवाह नोंदणी, शिरसगाव, ता. कडेगांव जि. सांगली यांचे कार्यालयात नोंद करणेचे राहून गेले आहे. सदरचा अर्ज अर्जदार यांचा मुलगा श्रीराज सतिश पवार यांचा जन्म दि. १३/०५/२०११ निबंधक जन्म, मृत्यू विवाह नोंदणी, शिरसगाव, ता. कडेगांव जि.सांगली यांचे कार्यालयातील रजिष्टरमध्ये नोंद होणेत यावी, म्हणून अर्जदारने सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी या जाहीर नोटीसीने कळविणेत येते की, अर्जदार यांचा मुलगा श्रीराज सतिश पवार यांचा जन्म दि. १३/०५/२०११ रोजी झालेला नाही असे कोणास सांगणेचे असेल तर त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसांत अगर दि. ०७/०२/२०२५ रोजी या मे. न्यायालयात हजर राहून आपआपल्या हरकती नोंदवाव्यात. जर कोणी मुदतीत हरकती न घेतलेस अर्जदारचा श्रीराज सतिश पवार यांचा जन्म दि. १३/०५/२०११ रोजी झालेला असलेबाबतची नोंद घेणेबाबत संबंधित कार्यालयास हुकूम होईल. मागाहून कोणाचीही तक्रार ऐकली जाणार नाही.
कडेगांव
म्हणून माझे सहीने व न्यायालयाचे शिक्यानिशी दिले जाहीर नोटीस दिली असे.
ता.३१/०७/२०२४

**सही/-**
**(रणजित भोसले)**
**उपविभागीय अधिकारी तथा दंडाधिकारी**
**कडेगांव उपविभाग कडेगांव**

## जाहीर नोटीस

### कडेगांव येथील मे.उपविभागीय अधिकारीसाो,यांचे न्यायालयात

क्र.एम.एजी.कावि/१३४/२०२४
दिनांकः–०३/१०/२०२४

सारिका अनिल जाधव
रा.उपाळे मायणी ता.कडेगांव जि.सांगली — अर्जदार

**विरूद्ध**

जन्म मृत्यू नोंदणी अधिकारी तथा,
ग्रामसेवक,ग्रामपंचायत उपाळे मायणी
ता.कडेगांव,जि.सांगली — जाबदार

ज्याअर्थी अर्जदार यांचा मुलगा साहिल अनिल जाधव यांचा जन्म दिनांक ०३/०१/२०१३ रोजी रा.उपाळे मायणी ता.कडेगांव जि. सांगली येथे झालेला आहे. अर्जदारचे कुटुंबातील लोक हे कायद्याचे बाबतीत अडाणी अशिक्षीत लोक असलेने साहिल अनिल जाधव यांची जन्म नोंद निबंधक जन्म, मृत्यू विवाह नोंदणी, रा.उपाळे मायणी ता. कडेगांव जि.सांगली यांचे कार्यालयात नोंद करणेचे राहून गेले आहे. सदरचा अर्ज अर्जदार यांचा मुलगा साहिल अनिल जाधव यांचा जन्म दिनांक ०३/०१/२०१३ रोजी निबंधक जन्म, मृत्यू विवाह नोंदणी उपाळे मायणी ता. कडेगांव जि.सांगली यांचे कार्यालयातील रजिष्टरमध्ये नोंद होणेत यावी, म्हणून अर्जदारने सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी या जाहीर नोटीसीने कळविणेत येते की, अर्जदार यांचा मुलगा साहिल अनिल जाधव यांचा जन्म दिनांक ०३/०१/२०१३ झालेला नाही असे कोणास सांगणेचे असेल तर त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसांत अगर दि ०३/११/२०२४ रोजी या मे. न्यायालयात हजर राहून आपआपल्या हरकती नोंदवाव्यात. जर कोणी मुदतीत हरकती न घेतलेस अर्जदार यांचा मुलगा साहिल अनिल जाधव यांचा जन्म दिनांक ०३/०१/२०१३ रोजी झालेला असलेबाबतची नोंद घेणेबाबत संबंधित कार्यालयास हुकूम होईल, मागाहून कोणाचीही तक्रार ऐकली जाणार नाही,
कडेगांव.
म्हणून माझे सहीने व न्यायालयाचे शिक्यानिशी दिले जाहीर नोटीस दिली असे.
ता.०३/१०/२०२४

**सही/-**
**(रणजित भोसले)**
**उपविभागीय अधिकारी तथा दंडाधिकारी**
**कडेगांव उपविभाग कडेगांव**

**ॲड. एस.पी.पाटील**
**कडेगांव, ता. कडेगांव, जि. सांगली**

## जाहीर नोटीस

### कडेगांव येथील मे.उपविभागीय अधिकारीसाो,यांचे कोर्टात

क्र.एम.एजी.कावि/७७/२०२४
(जन्म नोंद)

निलेश जगन्नाथ पवार — अर्जदार

**विरुध्द**

ग्रामसेवक, (ग्रामअधिकारी) ग्रामपंचायत–
शिरसगाव, ता. कडेगांव, जि. सांगली — जाबदार

ज्याअर्थी अर्जदारचा मुलगा स्वरुप निलेश पवार यांचा जन्म ता. ०५/०२/२००६ रोजी मौजे शिरसगाव, ता. कडेगांव, जि. सांगली येथे झालेला आहे.

अर्जदारचे कुटुंबातील लोक हे कायद्याचे बाबतीत अडाणी अशिक्षीत लोक असलेने स्वरुप निलेश पवार यांच्या जन्माची नोंद निबंधक जन्म, मृत्यू विवाह नोंदणी, मौजे शिरसगाव, ता. कडेगांव यांचे कार्यालयात नोंद करणेचे राहून गेले आहे. सदरचा अर्ज स्वरुप निलेश पवार याची जन्म नोंद (ता. ०५/ ०२/२००६) नोंद निबंधक जन्म, मृत्यू विवाह नोंदणी, शिरसगाव, ता. कडेगांव, जि. सांगली यांचे कार्यालयातील रजिष्टरमध्ये नोंद होणेत यावी म्हणून अर्जदारने सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

स्वरुप निलेश पवार यांचा जन्म ता. ०५/०२/२००६ रोजी मौजे शिरसगाव, ता. कडेगांव, जि. सांगली येथे झालेला आहे व सदरचे जन्माची नोंद होणेबाबत अर्जदारने सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी या जाहीर नोटीसीने कळविणेत येते की, स्वरुप निलेश पवार जन्म ता. ०५/०२/२००६ रोजी झालेला नाही असे कोणास सांगणेचे असेल तर त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसांत अगर दि.६/२/२०२५ रोजी या मे. कोर्टात हजर राहून आपआपल्या हरकती नोंदवाव्यात. जर कोणी मुदतीत हरकती न घेतलेस स्वरुप निलेश पवार यांचा जन्म ता. ०५/०२/ २००६ रोजी झालेला असलेबाबतची नोंद घेणेबाबत संबंधित कार्यालयास हुकूम होईल. मागाहून कोणाचीही तक्रार ऐकली जाणार नाही.
म्हणून माझे सहीने व न्यायालयाचे शिक्यानिशी दिले जाहीर नोटीस दिली असे.
कडेगांव
ता ३१/१२/२०२४

**सही/-**
**मे.उपविभागीय अधिकारी**
**कडेगांव उपविभाग कडेगांव**

**ॲड. एस.पी.पाटील**
**कडेगाव, ता. कडेगांव, जि. सांगली**

## जाहीर नोटीस

### कडेगांव येथील मे.उपविभागीय अधिकारीसाो,यांचे कोर्टात

क्र.एम.एजी.कावि/७४/२०२४
(जन्म नोंद)

सतिश जगन्नाथ पवार — अर्जदार

**विरुध्द**

ग्रामसेवक, (ग्रामअधिकारी) ग्रामपंचायत–
शिरसगाव, ता. कडेगांव, जि. सांगली — जाबदार

ज्याअर्थी अर्जदारची मुलगी सई सतिश पवार हिचा जन्म ता. १६/ ०७/२००८ रोजी मौजे शिरसगाव, ता. कडेगांव, जि. सांगली येथे झालेला आहे.

अर्जदारचे कुटुंबातील लोक हे कायद्याचे बाबतीत अडाणी अशिक्षीत लोक असलेने सई सतिश पवार हिच्या जन्माची नोंद निबंधक जन्म, मृत्यू विवाह नोंदणी, मौजे शिरसगाव, ता. कडेगांव यांचे कार्यालयात नोंद करणेचे राहून गेले आहे. सदरचा अर्ज सई सतिश पवार हिची जन्म नोंद (ता. १६/ ०७/२००८) नोंद निबंधक जन्म, मृत्यू विवाह नोंदणी, शिरसगाव, ता. कडेगांव, जि. सांगली यांचे कार्यालयातील रजिष्टरमध्ये नोंद होणेत यावी म्हणून अर्जदारने सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

सई सतिश पवार हिचा जन्म ता. १६/०७/२००८ रोजी मौजे शिरसगाव, ता. कडेगांव, जि. सांगली येथे झालेला आहे व सदरचे जन्माची नोंद होणेबाबत अर्जदारने सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी या जाहीर नोटीसीने कळविणेत येते की, सई सतिश पवार हिचा जन्म ता. १६/०७/२००८ रोजी झालेला नाही असे कोणास सांगणेचे असेल तर त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसांत अगर दि.५/ २/२०२५ रोजी या मे. कोर्टात हजर राहून आपआपल्या हरकती नोंदवाव्यात. जर कोणी मुदतीत हरकती न घेतलेस सई सतिश पवार हिचा जन्म ता. १६/ ०७/२००८ रोजी झालेला असलेबाबतची नोंद घेणेबाबत संबंधित कार्यालयास हुकूम होईल. मागाहून कोणाचीही तक्रार ऐकली जाणार नाही.
म्हणून माझे सहीने व न्यायालयाचे शिक्यानिशी दिले जाहीर नोटीस दिली असे.
कडेगांव
ता ३१/१२/२०२४

**सही/-**
**मे.उपविभागीय अधिकारी**
**कडेगांव उपविभाग कडेगांव**